# शून्य ते शिखर

## भारतीय कॉर्पोरेट जगताचा विकास

प्रकाश बियाणी
कमलेश माहेश्वरी

अनुवाद
रेखा देशपांडे

Indra Publishing House
www.indrapublishing.com

**प्रमुख वितरक : अजब डिस्ट्रीब्युटर्स**
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी, शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
ajabpublications@gmail.com
www.ajabgroup.com

**शून्य ते शिखर :** प्रकाश बियाणी / कमलेश माहेश्वरी
अनुवाद : रेखा देशपांडे

**© प्रकाश बियाणी / कमलेश माहेश्वरी**

**प्रकाशक**
Indra Publishing House
E-5/21, Area Colony,
Hbibganj Police Station Road,
Bhopal 462016
Phone : +91 755 4059620, 4030921
Email : manish@indrapublishing.com
**Printed by Sheetal Mehta, Kolhapur**

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स/रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई वॉर्ड, शामराव विठ्ठल बँकेशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर.

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
प्रथम आवृत्ती - २०१०
द्वितीय आवृत्ती - २०१३
जनआवृत्ती - सप्टेंबर २०१६

**किंमत**
₹ २९५/-

ती. आईस

प्रकाश बियाणी

सुनीता बियाणी

## हे पुस्तक का

# तयार आहे हिंदुस्थान

महान अर्थशास्त्री विष्णुगुप्त चाणक्य यांनी कित्येक शतकांपूर्वी सुवर्णयुगाची कल्पना साकार केली होती. चंद्रगुप्त मौर्य यांना सम्राट बनविण्याचा 'चाणक्यी-संकल्प' एक निमित्तमात्र होते. लक्ष्य होते - 'सुराज'. अद्‌भुत संयोग असा की, दोन दशकांपूर्वी पुन: एक अर्थशास्त्री-अध्यापक देशाच्या राजकारणी मंचावर अवतरित झाला, ज्याने लोकांच्या मनात विश्वास निर्माण केला की, कितीही समस्या आणि अडचणी असल्या तरी भारतात इतकी भौतिक आणि मानवी साधनसामग्री उपलब्ध आहे की, आमचा देश वैश्विक-आर्थिक शक्ती होण्यास समर्थ आहे.

सन १९४७ मध्ये आम्ही सर्वांनी स्वप्न बघितले होते की, स्वतंत्र भारत एक असे स्वावलंबी राष्ट्र असेल, जेथे प्रत्येकाला अन्न, वस्त्र आणि निवाराच नाही, तर शिक्षण, स्वच्छता आणि स्वास्थ्यदेखील उपलब्ध होईल. १५ ऑगस्टला लाल किल्ल्याच्या प्राचीरीवरून दर वर्षी एक डझन पंतप्रधानांनी या संकल्पाची पुनरावृत्ती केली; परंतु असे झाले नाही, किंबहुना आम्हाला त्यांच्याकडून मिळाले 'आर्थिक गतिविधींवर प्रतिस्पर्धा-प्रतिरोधक प्रतिबंध' आणि कर आकारणीत इतकी वाढ जी धनोपार्जनाला हतोत्साहित करते किंवा बेइमानीला प्रोत्साहित करते.

नि:संदेह स्वतंत्र भारताचे प्रथम पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू एक स्वप्नदर्शी महान नेता होते; परंतु देशहितार्थ प्रामाणिकपणे काम करण्याची इच्छाशक्ती ते आपल्या मित्र-साथीदारांच्या आणि अधिकाऱ्यांच्या मन-मस्तिष्कात विकसित करू शकले नाहीत. इतकेच नव्हे, दुर्दैवाने देशाच्या आर्थिक विकासासाठी पंडित नेहरूंनी 'रशियन मॉडेल' अंगीकृत केले. प्रतिबंधित अर्थव्यवस्थेच्या प्रणालीनुसार 'धनोपार्जन सामाजिक अपराध' आहे. आमच्या देशात तर याचे क्रियान्वयन करण्यातदेखील चूक झाली. संसाधनांच्या नियंत्रित आणि मितव्ययी उपयोगामुळे देशात प्रतिस्पर्धेचे वातावरण अशा वेळी निर्मित झालेच नाही जेव्हा त्याची सर्वांत जास्त गरज होती. उद्योग जगताने 'माइंड सेट' तयार केले की, देशाच्या आर्थिक विकासात त्यांची काहीही गरज नाही. परिणामी, आर्थिक विकासाचे सगळे ओझे सरकारी क्षेत्रावर लादण्यात आले. त्यांना सगळी संसाधनं आणि संरक्षण तर उपलब्ध होते; परंतु कुणासोबत प्रतिस्पर्धा नसल्याने ते राजकारणी आणि

अधिकाऱ्यांसाठी 'सोन्याची खाण' आणि कामगारांसाठी 'चैनीचे स्थान' झाले. त्यात कर्मचाऱ्यांची/कामगारांची संख्या तर वाढत गेली; परंतु उत्पादन सतत कमी होत गेले. देशाला ना समाजवादी अर्थव्यवस्थेचा फायदा झाला ना मुक्त बाजार पध्दतीचा. भारत एक गैर-प्रतिस्पर्धी 'आयलँड' बनून राहिला.

सन १९६६ मध्ये काँग्रेस नेत्यांनी इंदिरा गांधींना 'मुकी बाहुली' समजून पंतप्रधान नेमले. त्यांचे सगळे लक्ष आपला जनाधार वाढविण्यावर होते. त्यांना असे काही करावयाचे होते की, त्यांची लोकछबी चमकावी. इंदिरा गांधींनी शॉर्टकट निवडला आणि लोकाकर्षक नारा दिला – 'गरिबी मिटवा.' गरिबी दूर करण्याच्या नावाखाली प्रतिबंधाचे नवे युग सुरू झाले. राजनेते आणि अधिकारी दोघांची संप्रभुता इतकी प्रबळ आणि प्रखर झाली की, देशात उद्योग स्थापन आणि संचालन खडतर काम झाले. उद्योग-स्थापनेचे लायसन्स मिळविण्यातच भारी कमाई होऊ लागली. उद्योगपतींचा वेळ आणि ऊर्जा, हवाई यात्रा आणि मंत्रालयांच्या गल्ली-बोळांत खर्च होऊ लागले. देशातील संपूर्ण वाणिज्यिक गतिविधी एका निर्धारित चक्रव्यूहात (सर्कल) सीमित होऊन गेल्या. गैर-प्रतिस्पर्धी औद्योगिक वातावरण आणि अराजक मार्केटमध्ये उपभोक्त्यांचे खूप शोषण झाले. सगळा देश अभावातच जगला. उत्पादनावर सरकारी नियंत्रण असल्याने त्यावेळी आम्ही दैनंदिन आवश्यकतेच्या छोट्या-छोट्या वस्तूंसाठीदेखील दीर्घ प्रतीक्षा केली. इतकेच नव्हे, सरकारी खर्च वाढल्याने त्याची पूर्ती करण्यासाठी प्रत्येक पातळीवर नियंत्रण आणि प्रत्येक बजेटमध्ये करआकारणी वाढतच गेली. करआकारणी इतकी झाली की, प्रामाणिकपणाने कर्ज चुकवाल, तर स्वत:च्या कमाईच्या खुरचणीपासूनदेखील वंचित व्हाल. देशात ब्लॅक मनीचा समानांतर आर्थिक ढांचा उभा राहिला.

**श्रीमंती असा मानवाधिकार आहे, जो मागण्याने मिळत नसतो :**

या उपभोक्ता लुटीमुळे कुणी किती कमावले याचे आकलन कधी झालेच नाही. विडंबना अशी की, जनआक्रोशापासून वाचण्यासाठी दोषी लोकांनी वाणिज्यिक समुदायावर दोषारोपण केले. त्यांना नफेबाज, कर-चोर आणि समाजशोषक बनवून सादर करण्यात आले. या लुटीत त्यांचा हिस्सा किती किंवा परिस्थितीमुळे ते किती बिघडले, हे मुद्दे गौण झाले. देशात एक कृत्रिम वातावरण तयार झाले – 'धन कमावणे वाईट काम आहे.' विचारपूर्वक षड्यंत्र आखून हे विचार सामान्य माणसाच्या मनात ठसविण्यात आले. असे हिंदी सिनेमे आठवा ज्यात गरिबीला ग्लॅमराइज्ड केले जात असे आणि गिरणीमालकांना गरिबांचा शत्रू दाखवले जात असे. आणखी आठवा, शालेय पाठ्यक्रमांतील निबंध, ज्यांचा सार असायचा, 'साधे जीवन जगावे, कमी कमवावे, कमी खावे, जाड

कापड घालावे, पायी चालावे.' या गोष्टी फक्त पुस्तकी आदर्श, अपवाद किंवा विवशता असू शकतात. एका सामान्य माणसाची सर्वांत पहिली आणि सर्वांत मोठी इच्छा असते, संपूर्ण कुटुंबाची आर्थिक सुरक्षा आणि संपन्नता. या सगळ्यांपेक्षाही मोठी दु:खाची गोष्ट अशी की 'धनोपार्जन पाप आहे' अशा विचारसरणीमुळे, भारतीय उद्यमशीलता इंग्रजांच्या बाबू संस्कृतीपेक्षाही जास्त हतोत्साहित झाली. उत्तम शेती, मध्यम व्यापार, निकृष्ट नोकरी.... ही वंशजांची शिकवण विसरून आम्ही जे गमावले, त्याला धीरूभाई अंबानींनी अशा शब्दांत अगदी स्पष्टपणे व्यक्त केले आहे 'जो समाज धनोपार्जन करणाऱ्यांना दोष देतो, तो दारिद्र्यात जगत असतो.'

सन १९९१ मध्ये स्थिती अशी झाली की, विदेशी मुद्रा रिझर्व्ह कमी होऊन १.१ बिलियन डॉलर झाला. जगातील इतर देशांनी भारताला दिवाळखोर घोषित करावे, या अप्रिय स्थितीपासून बचावण्यासाठी भारत सरकारने बैंक ऑफ इंग्लंडजवळ २५ टन सोने गहाण ठेवून २० कोटी डॉलर गोळा केले. समस्याचे हे फोटो निदान होते. नरसिंह राव सत्तारूढ झाले तेव्हा चाणक्याचा चतुरपणा दाखवत त्यांनी, शिक्षक ते ब्यूरोक्रेट झालेल्या डॉ. मनमोहन सिंग यांना नॉर्थ ब्लॉक सुपूर्द केला. देशाच्या पहिल्या टेक्नोक्रेट (वित्त विशेषज्ञ) वित्तमंत्र्याने देशाला आर्थिक स्वातंत्र्य देण्याची जोखीम घेतली. देशाच्या अर्थव्यवस्थेने वेगळे वळण घेण्यास सुरुवात केली.

सन १९९१ नंतर उद्योग जगताला केव्हा, कसे आणि किती स्वातंत्र्य मिळाले, यापेक्षा जास्त महत्त्वाचे आहे जनमानसाचे 'माईंड सेट' परिवर्तित होणे. उदारीकरण आणि नियंत्रणमुक्तीबरोबर प्रतिस्पर्धेचे जे तीक्ष्ण आणि तीव्र वादळ उठले, ते सर्वांत अगोदर आमच्या या विचारसरणीला उडवून घेऊन गेले की, धन कमावणे पाप आहे. उद्योग स्थापना आणि संचालनासाठी पुंजी सहज रीतिने उपलब्ध झाल्याने आणि 'लायसन्स' नव्हे तर नवीन 'बिझनेस आइडिया,' उद्योगाची स्थापना आणि यशाचा पाया झाल्याने न्यू जनरेशन उद्यमींनी पूर्ण जोमाने मैदान सांभाळले. स्थापित उद्योगपतींनीदेखील तांत्रिक उन्नयन आणि व्यावसायिक विस्तारासाठी भरपूर निवेश केला. परिणामत: भारतीय उद्योगपती बहुराष्ट्रीय कंपन्यांचा देशी-विदेशी मार्केट्समध्ये सामना करू लागले. जनमानसाची विचारसरणी बदलण्याची आणि भारतीय उद्योगपतींनी प्रतिस्पर्धी होण्याची अनेक प्रेरक आणि रोचक उदाहरणं आहेत, जसे -

- नारायण मूर्तींसारखे उद्यमी आदर्श आहेत की, पुंजी आणि संरक्षण (गॉडफादर) शिवाय मध्यमवर्गीय शिक्षितसुद्धा उद्योग स्थापित करू शकतात.

– अझीम प्रेमजी किंवा आनंद महिन्द्रा यांच्यासारख्या उद्योगपतींनी सिद्ध केले आहे की, भारतातसुद्धा प्रामाणिकपणा आणि नैतिकता राखून उद्योग केल्यावर 'बिलेनियर' होता येते.

– रतन टाटा किंवा कुमारमंगलम बिड़ला यांनी आपल्या थकलेल्या उद्योगांना 'शून्यापासून शिखरावर' पोहोचविले.

– सुनील भारती मित्तल, किशोर बियाणी किंवा अशोक पाटनी यांनी सिद्ध केले की, उत्पादन आणि सेवा लागत व आपला नफा कमी करून भीषण प्राइज वॉर जिंकले जाऊ शकते.

– मुंजाल कुटुंब, फॅमिली रन बिझनेसला प्रोफेशनली मॅनेज्ड बनविण्याचे आदर्श उदाहरण आहे.

– देशबंधू गुप्ता यांनी पहिल्या डावाच्या पराभवाला दुसऱ्या डावाचा पाया बनवले आहे.

– सुधीर अग्रवाल यांनी सिद्ध केले की, ते मायावी व्यवसायाच्या यशस्वी संचालनाचे आदर्श आहेत.

– युसूफ के. हमीद यांच्यासारखे उद्यमी पैरेंट कायद्याच्या कुबड्या घेऊन फार्मा उद्योगात नफेबाजांसाठी वैश्विक आव्हान झाले आहेत.

– सुभाष चंद्रा, अनिल अग्रवाल किंवा गोविंदभाई काकड़िया यांनी साधारण शिक्षित असूनसुद्धा विश्वव्यापी व्यवसाय स्थापित केलेत.

देशातील उद्योग जगताच्या ध्वजारोहक उद्योगपतींची ही यादी बरीच मोठी आहे, जे उदारीकरणाच्या पहिल्या दशकात शतकानुशतकांचे पारतंत्र्य आणि पन्नास वर्षांच्या प्रतिबंधित वातावरणात सुप्त झालेल्या उद्यमशीलतेचे उत्प्रेरक आहेत. लक्षात असू द्या की, उदारीकरणाच्या दुसऱ्या दशकात जेव्हा या भारतीय उद्यमींनी मोठ्या मजबुतीने मोर्चा सांभाळला तेव्हा सगळे जग म्हणू लागले की सावधान! झोपी गेलेला टायगर (भारत) जागा झाला आहे. हे कथन अतिशयोक्तीपूर्ण नाही.

सन २००८ मध्ये लेहमन ब्रदर्सचे दिवाळे निघाल्यानंतर वैश्विक अर्थव्यवस्था डळमळली, तर भारतीय कंपन्यांचे निर्यात उत्पन्न आणि नफादेखील कमी झाला. भारतीय शेअर मार्केटने (बीएसई सूचकांक २१ हजारपासून ८००० च्या स्तरावर) देखील गटांगळी खाल्ली; परंतु आज दोन्ही आपल्या पूर्वीच्या जागी परतले आहेत. सन १९९१ मध्ये जो आंतरराष्ट्रीय मुद्राकोष आमच्या बाजू पिरगाळत होता, तो आज विकसित राष्ट्रांसमोर आमच्या बँकिंग प्रणालीचे अनुकरणीय उदाहरण सादर करत आहे.

एकेकाळी विदेशी कंपन्या भारतीय कंपन्यांची खरेदी करत होत्या, आज भारतीय उद्योगपती विदेशी कंपन्यांची खरेदी करताहेत. भारत आज जगातील दुसरा सर्वांत मोठा मॅन्युफॅक्चरिंग हब झाला आहे. आपल्या आजूबाजूच्या अशा मध्यमवर्गीय कुटुंबांकडे बघा, ज्यांनी पन्नास वर्षे अभावात घालवली, ते आज एक चांगले आयुष्य जगताहेत. कधी काळी पूर्ण कुटुंबासाठी एका स्कूटरचे स्वप्न बघत होते, आज घरातील प्रत्येक वयस्क सदस्याजवळ स्वत:चे वाहन आहे. नि:संदेह परिवर्तनाची ही लाट अजून देशातील ग्रामीण भागात पोहोचलेली नाही; परंतु आता त्यांचेही दिवस पालटू लागले आहेत. फूड प्रोसेसिंग सुविधा, रस्त्यांचे नेटवर्क आणि संभावनेनुसार न्यूक्लियर पॉवरपासून ४० हजार मेगावॅट अतिरिक्त वीज निर्माण होऊ लागली की, ग्रामीण लोकसंख्येचे श्रम, वेळ आणि वेस्टेज कमी होईल आणि उत्पन्न वाढेल. देशात आज कुशल-अकुशल कामगार आणि टेक्नोक्रेट्सचा तोटा नाही, तर त्यांचा आत्मविश्वासदेखील इतका गगनचुंबी झालेला आहे की, आयुष्यभर सुरक्षा देणारी नोकरी करण्याची त्यांची इच्छा नाही. 'जॉइन टुडे-लीव्ह टुमारो'चे सूत्र आत्मसात करून त्यांच्यासाठी नोकरी बदलणे म्हणजे मोठ्या संभावनेचा शोध लावणे आहे, जी चहूबाजूला प्रचंड प्रमाणात विखुरलेली आहे. सत्य हे की, आज देशात बेरोजगारी नाही, तर बेरोजगार आहेत. बेरोजगारदेखील असे लोक आहेत ज्यांना 'इझी मनी' हवा असतो, जेव्हा की श्रीमंती मानवाधिकार आहे; परंतु ती कुणाकडून कुणाला तबकात भेट म्हणून दिली जात नसते. थोडक्यात सांगायचे तर आम्ही भारतीय 'चालतं' (चलता है) या विचारसरणीतून मुक्त होऊ लागलो आहोत. 'आम्हीसुद्धा करू शकतो' असं म्हणायला आणि करायला आम्ही शिकलो आहोत. देशाच्या अर्थव्यवस्थेला उन्मुक्त उडण्यासाठी पंख लाभले तेव्हा दोन दशकांत असा चमत्कार घडला, जो गेल्या कित्येक शतकांत झालेला नव्हता.

या पुस्तकासाठी मी आणि माझे सहलेखक कमलेश माहेश्वरी यांनी ३५ उद्योगपतींना निवडले आणि त्यांचे चमत्कार लिपीबद्ध केले. शेवटी ही पुनरावृत्ती करणे प्रासंगिक ठरेल की, फ्रीलान्स लेखक म्हणून आमच्या देशात मध्यमवर्गीय जीवनमानसुद्धा तेव्हाच शक्य असते, जेव्हा शुभेच्छू मित्र-कुटुंबीयांचे पाठबळ लाभते. माझे असेच शुभेच्छू आहेत - सुधीर अग्रवाल (डीबी कॉर्प), अशोक पाटनी (आर.के.मार्बल), प्रमोद फरक्या (विजिलेन्स पब्लिसिटी), निशिथ शरण (यूथोपिया कन्सल्टेंसी), अशोक गुप्ता (नॅशनल इंडस्ट्रीज), पं.विजयशंकर मेहता (जीवन प्रबंधन समूह). आपल्या दोन मुली अंशु व अंचलकडून मला दोन जावई-पुत्र मनीष भाटी आणि कमलेश माहेश्वरी यांची देणगी लाभली आहे, जे मला चिंतामुक्त लेखनाची सुसंधी प्रदान करतात. या पुस्तकाच्या

प्रसव वेदनेत माझ्या पत्नी सुनीता बियाणी यांच्यासोबत भागीदार झाले आहेत माझे दोन सहयोगी मित्र - नरेंद्र मौर्य. या पुस्तकाचे मराठी रूपांतरण, सुश्री रेखा देशपांडे यांनी केलेला एक श्रम व साध्य प्रयत्न आहे, जो वाचकांच्या प्रशंसेला पात्र ठरेल.

अशाच विश्वासाने देवी सरस्वतीच्या चरणी आम्ही विनम्रतेने सादर अर्पण करीत आहोत.

**प्रकाश बियाणी**

सुरभी ३४, रविनगर (श्रीनगर एक्सटेंशन), इन्दौर (म.प्र.)

मो. ९३०३२२३९२८/ ९८९३०२३९२८/ ०७३१-२५६०७७७